# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 14.03.2024** **वार: गुरुवार**

---

**मोहोळ**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं पुण्यातून माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. अजून निवडणूक जाहीर झालेली नसली तरी मोहोळ यांनी आज पुण्याचं ग्रामदैवत असलेल्या कसबा गणपतीचं दर्शन घेऊन आपल्या प्रचार मोहिमेचा प्रारंभ केला. सत्तारूढ महायुतीकडून पुण्याची जागा भाजपसाठी सोडण्यात आली आहे तर विरोधी महाविकास आघाडीचं जागावाटप अद्याप अधिकृतपणे जाहीर झालेलं नाही.

**कमोडोर**

कमोडोर समीर चौधरी यांनी नुकतीच लोणावळ्याच्या INS शिवाजीच्या कमांडिंग ऑफिसर पदाची सूत्रं स्वीकारली. लोणावळ्यात झालेल्या संचलनात कमोडोर मोहित गोयल यांनी कमोडोर समीर चौधरी यांना पदाची सुतर दिली. कमोडोर समीर चौधरी नौदल अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे माजी विद्यार्थी आहेत. यापूर्वी त्यांनी नवी दिल्लीतल्या नौदल मुख्यालयात सागरी अभियांत्रिकी संचालनालयाचं प्रमुखपद भूषवलं आहे.

**बालनाट्य**

राज्य बालनाट्य स्पर्धेच्या बीडमध्ये झालेल्या, अंतिम फेरीत, पुण्यातल्या न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग प्रशालेच्या आभाळमाया या नाटकाला  प्रथम क्रमांक मिळाला आहे. दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश योजना आणि अभिनयाची पारितोषिकंही प्रशालेच्या या नाटकाला मिळाली आहेत. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त, प्रशालेत करण्यात आलेल्या विकास कामात, नाट्यशास्त्र वर्गासाठी स्वतंत्र नाट्यगृह उभारण्यात आलं असून, नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून पाठ्यक्रमात नाट्यशास्त्र या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**कारवाई**

अतिक्रमणावर धडक कारवाई करण्यासाठी पुणे महापालिका दहा गाड्या खरेदी करणार असून त्यासाठी 2 कोटी 14 लाख रुपये खर्चाच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. शहरातील अतिक्रमणं काढण्यासाठी गाडी उपलब्ध नसल्याचं कारण देत कारवाईमध्ये टाळाटाळ होते. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाच्या वतीनं सांगण्यात आलं.

**ओला-उबर**

पुणे, पिंपरी चिंचवड आणि बारामतीमध्ये शहरांतर्गत वाहतूक करण्यासाठी परवानगी नाकारल्यानंतरही, बेकायदा वाहतूक सुरु ठेवणाऱ्या ओला आणि उबर या खासगी कंपन्यांविरुद्ध कारवाईसाठी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं 4 स्वतंत्र पथकं तैनात केली आहेत. बंदीच्या निर्णयाविरोधात अपील करण्यासाठी दोन्ही कंपन्यांना 30 दिवसांची मुदत देण्यात आली असली तरी या काळात त्यांना शहरांतर्गत वाहतूक मात्र करता येणार नाही.

**ईआरपी**

पिंपरी चिंचवड महापालिकेत ईआरपी प्रणालीमुळे सर्व कामकाज ऑनलाईन होणार आहे. विवाह नोंदणी प्रणाली, प्रेक्षागृह, नाट्यगृहे नोंदणी, माहिती अधिकार अर्ज, माहिती अधिकार प्रणाली, पशुवैद्यकीय व्यवस्थापन या विभागाच्या

जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीचं अनावरण पालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते झालं. या प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या 35 विभागांमध्ये दैनंदिन कामकाज कागदविरहीत होईल.

**पॅड केअर उपक्रम**

पुणे महापालिकेच्या सहकार्यानं पॅडकेअर संस्थेनं, पालिकेच्या मुख्य इमारतीमधल्या सर्व महिला शौचालयांमध्ये 25 सॅनिटरी डिस्पोसिंग बीन्स बसवण्यात आहेत. प्रायोगिक स्वरूपात हा उपक्रम तीन महिन्यांसाठी राबवण्यात येणार असून त्यासाठी सर्व स्वच्छता कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात आलं आहे. या बिन्समुळे कार्बन उत्सर्जनही कमी होणार आहे. त्यामुळे या उपक्रमाचा लाभ घेण्याचं आवाहन पॅडकेअर संस्थेनं केलं आहे.

**दिव्यांग-शिबीर**

भारत विकास परिषदेच्या पुणे शाखेच्या विकलांग केंद्राच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त येत्या रविवारी राज्यातल्या150 दिव्यांगाना अत्याधुनिक कृत्रिम पाय, हात आणि कॅलिपर देण्यासाठी मोफत शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. हे शिबीर पुण्यातील डोणजे इथल्या आपलं घर संस्थेच्या कौशल्या कराड ग्रामीण रूग्णालयात सकाळी नऊ ते दुपारी दोन या वेळेत होणार आहे. यामध्ये अधिकाधिक दिव्यांगानी नावनोंदणी करावी असं आवाहन संयोजकांनी केलं आहे.

**सर्पोद्यान**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय आणि सर्पोद्यानाच्या विस्तारीकरणाचं काम सुरू झालं आहे असून या वर्ष अखेरीपर्यंत हे काम पूर्ण होऊन सर्वांसाठी खुलं केलं जाईल असे महापालिका प्रशासनानं म्हटलं आहे. 2017 पासून हे प्राणी संग्रहालय सर्वसामान्यांसाठी बंद आहे. सात एकर जागेतल्या या संग्रहालयात सध्या 184 प्राणी आहेत.

**हॉकी**

14 व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा नेहरूनगर-इथल्या मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर सुरू झाल्या आहेत. काल महाराष्ट्र हॉकी संघानं केरळ हॉकी संघाचा पराभव करत विजयी सलामी दिली. अन्य सामन्यांमध्ये मध्य प्रदेश, बंगाल, झारखंड आणि तेलंगण या संघानं आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत उद्घाटनाचा दिवस गाजवला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 आणि किमान तापमान 14 पूर्णांक 9 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्या आकाश निरभ्र राहून, किमान तापमानात अल्पशी घट होण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**